शासकीय औद्योगिक  प्रशिक्षण संस्था, कल्याण

# सर्वसाधारण नियम

1) प्रशिक्षणार्थ्यास शासकीय नियमानुसार उपस्थितीचे प्रमाण किमान 80% टक्के राखणे अन्यथा परीक्षेला बसू दिले जाणार नाही.
2) प्रशिक्षणार्थ्याने  वेळापत्रकानुसार व शिफ्ट नुसार संस्थेत नेमून दिलेल्या गणवेशात हजर राहावे लागेल.
3) संस्थेत आल्यानंतर विशेष कारणाशिवाय व संस्थाप्रमुखांची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय बाहेर पडता येणार नाही.
4) प्रशिक्षणार्थ्याने ओळखपत्र जवळ बाळगणे अनिवार्य असेल.
5) संस्थेच्या आवारातील शासकीय मालमत्तेचे नुकसान केल्यास त्याची भरपाई करावी लागेल.
6) प्रशिक्षणार्थ्याने सकाळी 9:45 am वाजता व सायंकाळी 5:00 pm वाजता प्रार्थनेस उपस्थित राहणे अनिवार्य आहे.
7) प्रशिक्षणार्थ्याने स्वतःचा विभाग सोडून इतरत्र फिरण्यास मनाई आहे तसेच मोबाईलचा वापर जबाबदारीने व संयमित करावा.
8) इतर मुलांना त्रास देणे दमदाटी करणे शेरेबाजी करणे छेडछाड करणे (रॅगिंग)  चे प्रकार आढळून आल्यास पटावरून नाव कमी करण्यात येईल.
9) आजारी रजा हवी असल्यास वैद्यकीय दाखला आणणे आवश्यक आहे.
10) 26  जानेवारी, 15 ऑगस्ट, व 1 मे रोजी ध्वजवंदनास उपस्थित  राहावे.
11) संस्था परिसरात व्यसन केल्यास व बेजबाबदार वर्तन केल्यास  पोलीस स्टेशनला कळविण्यात येईल याची नोंद घ्यावी.
12) विनासूचना व विनापरवानगी सलग दहा दिवस गैरहजर राहिल्यास नाव पटावरून कमी करण्यात येईल.